# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालयीन विभाग)


जा.क्र./महा.वि./गो.वि./ 920 /२०१८ दिनांक : 7 /०९/२०१८

प्रति,

मा. प्राचार्य,
अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

विषय :— संस्था स्थलांतरणाबाबत.
संदर्भ :—मा. संचालक तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/संस्था स्थलांतरण/२०१८/१०७३ दि. १०/०८/२०१८ प्राप्त दि. ०३/०९/२०१८

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, सोबत संदर्भिय पत्र संलग्नित केलेले असून सदर पत्राचे अवलोकन करावे व त्या अनुषंगाने कार्यवाही घ्यावी.

(डॉ. व्ही. सी. सिलारे)
उपकुलसचिव प्र.
महाविद्यालय विभाग
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

प्रतिलिपी:— मा. संचालक तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई४०० ००१


एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५
**E-Mail** : arcollegesectiongug48@gmail.com

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
विद्यार्थी विभाग
आवक क्र. 3720 दि. 14/08/18
जावक क्र. 3523 दि. 1/09/18

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

कार्यालयीन आदेश

क्र.२/एनजीसी/संस्था-स्थलांतरण/२०१८/9003
दिनांक : 10 AUG 2018

पहा : १) शासन अधिसूचना क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र. ४७३(भाग ३)/तांशि-४, दि. २८.०४.२०१७
२) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०१८/७५०, दि. १९.०६.२०१८
३) सहसंचालक, तंत्र शिक्षण,विभागीय कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. तंशिस/प्राकाना/शैवि/विसंब/२०१८/२६७३, दि. ०८.०८.२०१८

प्रथम वर्षाचा अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर संस्था बदलास मान्यता देण्यास, संचालक, तंत्र शिक्षण यांना संदर्भ क्रमांक १ अन्वये प्राधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. याबाबत सहसंचालक, तंत्र शिक्षण,विभागीय कार्यालय, नागपूर यांचेकडून संदर्भ क्रमांक ३ अन्वये विद्यार्थी संस्था बदलाचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. विद्यार्थ्यी संस्था बदलाबाबत दि. २८.०४.२०१७ च्या अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील तरतुदीनुसार सोबतच्या Annexure A मध्ये नमूद केलेल्या विद्यार्थ्यांना संस्था व विद्यापीठ स्थलांतरणास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर संस्था व विद्यापीठ स्थलांतरण विद्यार्थ्यांच्या विनंतीनुसार केल्यामुळे होणा-या कोणत्याही शैक्षणिक परिणामास विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील, तसेच उमेदवाराची मुळ कागदपत्रे संस्थेकडून घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवार तथा त्याच्या पालकाची राहील.
२. संबंधित विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक आहे. उपस्थिती पूर्ण करणे व विहीत अभ्यासक्रम आणि टर्मवर्क पूर्ण करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
३. सदर संस्था व विद्यापीठ स्थलांतरणामुळे पूर्वीच्या संस्थेतील फी परतावा किंवा अदा करावयाची असल्यास तसेच स्थलांतरणाच्या संस्थेत फी अदा करण्याची जबाबदारी उमेदवाराची/ उमेदवाराच्या पालकाची राहील.
४. Annexure A मधील विद्यार्थ्यांच्या संस्था व विद्यापीठ स्थलांतरणास संबंधित संस्थेने दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्र व रिक्त जागा विचारात घेऊन मान्यता देण्यात आली आहे. याबाबत भविष्यात रिक्त जागा नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विद्यार्थ्याचे स्थलांतरण पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल परिणामस्वरुप विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्थेचे प्राचार्य व्यक्तीश: जबाबदार असतील.
५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी क्र. १११०८९ (५९४), दि. ०६.०८.२०१८ अन्वये दिलेल्या पात्रता प्रमाणपत्राच्या आधारे सदर संस्था व विद्यापीठ बदलास मान्यता देण्यात येत आहे.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 417 दिनांक 1/8/18
जावक क्र. ........ दिनांक ........

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, ८वा मजला, न्यू एक्सेलसिअर बिल्डींग,ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१यांना माहितीसाठी सादर

प्रत:- माहिती व पुढील कार्यवाही करीता:-
१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
२. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३. संबंधित संस्था (सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर यांचे मार्फत)
४. संबंधित विद्यार्थ्यी (प्राचार्यामार्फत)
५. कार्यासन क्रमांक ३, आयटी सेल, मुख्य कार्यालय, मुंबई ६. कार्यासन क्रमांक २, मुख्य कार्यालय, मुंबई